# पनवेल महानगरपालिका

## वैदयकीय आरोग्य विभाग

**कार्यालय :- देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी, पनवेल -४१०२०६.**


दुरध्वनी कार्यालय : ०२२- २७४५८०४०/४१/४२
वैद्यकीय आरोग्य विभाग : ०२२ - २७४५५७५१
ई-मेल : mohpmc05@gmail.com
फॅक्स नं. : ०२२- २७४५२२३३
आयुक्त कार्यालय : ०२२- २७४५२३३९
वेबसाईट: www.panvelcorporation.com


जा.क्र./पमपा/वै.आ.वि/२२५९/सन २०२३-२४

दिनांक : २०/१०/२०२३

# नियुक्ती आदेश

**विषय- औषधनिर्माता या पदावर करार पद्धतीने नेमणूक.**

**संदर्भ-** १. महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र. १०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ दि. १३ ऑगस्ट २०१४

२. महाराष्ट्र शासन शुद्धीपत्रक क्र. संकीर्ण- १११८/प्र.क्र.३९/१६-अ दि. १९ डिसेंबर, २०१८

३. मा. अतिरिक्त अभियान संचालक, राआअ,मुंबई यांचे पत्र जा.क्र. राअसो / NUHM/ पदभरती /मनपा/नपा/कटक/ नियोजन/९७३८९-६४७/२१ दि. ०४/०२/२०२१ व NUHM मंजुर प्रकल्प अंमलबजावणी आराखडा २०२२-२३

४. मा. आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान यांचे जा. क्रं. राआसो कक्ष/सुधारित पदभरती समिती /१०२६६-१०६००/२०२३ दि.२६/०४/२०२३ रोजीचे पत्र.

५. मा. आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान यांचे जा. क्रं. राआसोमुं/ मनुष्यबळ कक्ष/ पदभरती /१०६७०-११०१६/२०२३ दि.२७/०४/२०२३ रोजीचे पत्र.

६. या कार्यालयामार्फत पनवेल महानगरपालिकेच्या वेबसाईटवर दि. २/०६/२०२३ रोजी प्रसिद्ध केलेली औषधनिर्माता पदाची पदभरती जाहिरात.

७. या कार्यालयाच्या दि. १३/१०/२०२३ रोजीच्या मंजूर टिपणीनुसार औषधनिर्माता या पदासाठी दि. १६/१०/२०२३ रोजी पनवेल महानगरपालिकेच्या वेब साईटवर प्रसिद्ध केलेली पात्र व निवड झालेल्या उमेदवारांची यादी.

८. मा. अतिरिक्त अभियान संचालक, राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, मुंबई यांचे पत्र जा.क्र. रासो/ मनुष्यबळ कं. कर्म / मानधनवाढ / २७७७०-२८१४३/२०२३ दि. ०१/०६/२०२३

९. मा. अतिरिक्त अभियान संचालक, राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, मुंबई यांचे पत्र जा.क्र. रासो/ मनुष्यबळ कं. कर्म / अनुभव बोनस / २८१४४-५२४/२०२३ दि. ०१/०६/२०२३

१०. मा. सहसंचालक (अतांत्रिक), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे पत्र जा.क्र. राआसोम/आस्था/ बदली सुचना /४५२९८-३८८/२० दि.२८/०९/२०२०

११. मा. आयुक्त, आरोग्य सेवा तथा संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे पत्र जा.क्र. राआसो/ मनुष्यबळ / वयोमर्यादा – शुध्दीपत्र/ १४८१८-१५१८१/२०२२ दि.२८/०५/२०१९

१२. मा. आयुक्त, आरोग्य सेवा तथा संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे पत्र जा.क्र. राआसो/ मनुष्यबळ / पुर्ननियुक्ती मार्गदर्शक सुचना / १२५०४१-४४३/२०२२ दि.२८/१०/२०२२

१३. मा. सहसंचालक (अतांत्रिक) राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे पत्र जा.क्र. राआसो/ आस्था बायोमेट्रिक- मानधन अदायगी / ४४२४३-६२४/२०२१ दि. १२/८/२०२१ रोजीचे पत्र.

Scanned with OKEN Scanner

उपरोक्त संदर्भ क्र. ३ नुसार प्राप्त मार्गदर्शक सुचनाअन्वये NUHM पीआयपी २०२२-२३ मधील पनवेल महानगरपालिका राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानांतर्गत (NUHM) रिक्त पदांसाठी संदर्भ क्र. ६ अन्वये जाहिरात प्रसिद्ध करण्यात आलेली होती. संदर्भ १ ते ७ अन्वये प्राप्त सुचनांनुसार गुणांकन पद्धतीचा अवलंब करून गुणवत्तेनुसार पालिका स्तरावरील निवड समितीने आपली निवड पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राकरिता औषधनिर्माता या पदावर निव्वळ कंत्राटी तत्वावर करार पद्धतीने करण्यात आलेली आहे.

| अ. क्र | कंत्राटी कर्मचाऱ्याचे नाव | पदनाम | मूळ प्रवर्ग | निवड करण्यात आलेला प्रवर्ग | मासिक मानधन | पदस्थापनेचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पूनम रमेश मुंतोडे | औषधनिर्माता | SC | Open | १७,०००/- | ना.प्रा.आ.केंद्र कामोठे से. २२ |
| २ | दिपाली सुरज फडके | औषधनिर्माता | OBC | Open | १७,०००/- | ना.प्रा.आ.केंद्र पालेखुर्द |
| ३ | संजोक्ता राजाराम पाटील | औषधनिर्माता | OBC | Open | १७,०००/- | ना.प्रा.आ.केंद्र तळोजा फेज २ |
| ४ | रिंकू मशनाजीरो गायकवाड | औषधनिर्माता | SC | SC | १७,०००/- | ना.प्रा.आ.केंद्र काळुंद्रे / भिंगारी |
| ५ | निलम दत्तात्रय सोनवलकर | औषधनिर्माता | NT-C | NT-C | १७,०००/- | ना.प्रा.आ.केंद्र कळंबोली गाव |
| ६ | हर्षला बबन पाटील | औषधनिर्माता | OBC | OBC | १७,०००/ | ना.प्रा.आ.केंद्र खांदा कॉलनी से.९ |
| ७ | विकास दीपक तिरगुळ | औषधनिर्माता | OBC | OBC | १७,०००/ | ना.प्रा.आ.केंद्र कामोठे से.३५ |

औषधनिर्माता या पदासाठी दर महिना एकूण मानधन रु. १७,०००/- (रुपये सतरा हजार फक्त) पनवेल महानगरपालिका मार्फत कामावर रुजू दिनांकापासुन देण्यात येईल. तसेच नियुक्ती आदेश मिळाल्यापासून सात दिवसाचे आत मा. आयुक्त, पनवेल महानगरपालिका कार्यालय यांचेकडे हजर अहवाल सादर करावा व या कार्यालयातील हालचाल आदेश (Movement Order) घेऊन त्वरीत (सुट्टीचे दिवस वगळून) उपरोक्त दिलेल्या पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू व्हावे. सात दिवसाच्या आत उपरोक्त दिलेल्या पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू न झाल्यास आपणांस सदर नियुक्तीत रस नाही असे समजून आपली नियुक्ती रद्द समजण्यात येईल. संदर्भ क्र.१२ नुसार आपली नियुक्ती रुजू झालेल्या दिनांकापासुन ते २९.६.२०२४ रोजी पर्यंत निव्वळ कंत्राटी तत्वावर करण्यात येत आहे.

**<u>अटी व शर्ती :-</u>**

१. आपली तात्पुरत्या स्वरुपात करार पद्धतीने पदस्थापनेच्या ठिकाणी दिनांक.२१.१०.२०२३ पासुन दिनांक .२९.०६.२०२४ रोजी पर्यंत नियुक्ती करण्यात येत आहे.
२. सदर पदासाठी आपणांस दरमहा एकूण रु. १७,०००/- (रुपये सतरा हजार फक्त) इतके एकत्रित मानधन देण्यात येईल व इतर कोणताही भत्ता दिला जाणार नाही.
३. आपली नेमणुक NUHM पीआयपी वर्ष २०२२-२३ मधील करार पद्धतीने असल्याने कोणतीही नोटीस अथवा कारण न देता आपली सेवा केव्हाही समाप्त करण्यात येईल. सेवा समाप्त झाल्यास आपल्याला कोणत्याही न्यायालयात दावा करता येणार नाही.
४. वरील एकत्रित मानधनाव्यतिरिक्त आपणास काणतेही शासकीय कर्मचाऱ्यांस मिळणारे लाभ व सवलत अनुज्ञेय नाहीत.
५. राष्ट्रीय आरोग्य अभियान, राज्य आरोग्य सोसायटीमार्फत पारित केलेले आदेश राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत अधिकारी / कर्मचारी यांना लागू राहतील.

Scanned with OKEN Scanner

६. संदर्भ क्र. १० नुसार राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांना बदली धोरण लागू नसल्याने कर्मचाऱ्यांनी बदली प्रस्ताव / शिफारस सादर करण्यात येवू नये.

७. वार्षिक कामाचे अहवालावरून मुल्यमापन केले जाईल, काम असमाधानकारक आढळल्यास कोणतीही पूर्व सुचना न देता कामावरुन कमी करणेत येईल. संदर्भ क्र. ९ नुसार ज्यांचा मुल्यांकन अहवालातील शेरा Good/Very Good या मर्यादेतच आहे, त्यांना मानधनवाढ देय राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

८. राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कार्यरत असणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांनी नियुक्ती कालावधी संपणेपूर्वी १ महिना अगोदर नियुक्ती प्रस्ताव वैद्यकीय आरोग्य अधिकारी, पनवेल महानगरपालिका कार्यालयाकडील पत्र मिळालेनंतर मुदतीत सादर करावा, नियुक्ती प्रस्ताव वेळेत सादर न केलेस संबंधित अधिकारी / कर्मचारी यांना पुढील कालावधीसाठी पुर्ननियुक्तीची आवश्यकता नाही, असे समजुन संबंधिताना कामावरून कमी केले जाईल. सदरची नेमणूक चांगल्या वर्तणुकीवर अबलंबून राहील.

९. सदरची नेमणूक तात्पुरत्या स्वरुपाची असून कंत्राटी कालावधी संपल्यानंतर संबंधित पदावरील आपली नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल यासाठी आपणांस कोणत्याही प्रकारची पूर्वसूचना व कारण न देता कमी करण्याचा हक्क वैद्यकीय आरोग्य अधिकारी, पनवेल महानगरपालिका स्तरावर राखून ठेवलेला आहे.

१०. उमेदवारास पदाचा राजिनामा देणेचा असल्यास एक महिन्याची आगाऊ राजिनामा नोटीस देणे अथवा एका महिन्याचे वेतन भरणा करणे बंधनकारक राहील. तथापि अपवादात्मक परिस्थितीमध्ये (उदा. अन्य ठिकाणी नोकरीची संधी उपलब्ध झाली असेल व त्या पदावर विहीत कालावधीत हजर होणे आवश्यक असेल अशा वेळी सदरचा एक महिना मुदतपुर्व सुचनापत्राचा कालावधी संपण्यापुर्वी त्याला कार्यमुक्त करणे आवश्यक असेल तर अशा अधिकारी / कर्मचारी यांनी जेवढे दिवस काम केले असेल तेवढया दिवसांचे मानधन अदा करुन त्यांना कार्यमुक्त करण्यात येईल.

११. सदरची नियुक्ती ही प्रकल्प अंमलबजावणी आराखडा सन २०२२-२३ च्या अधीन राहून देणेत येत आहे. केंद्र शासनाने २०२३-२४ करीता कोणत्याही पदास मान्यता दिली नाही अथवा भविष्यात इतर कोणतीही अपवादात्मक परिस्थीती उद्भवल्यास सदर पदावरील कर्मचाऱ्यांची सेवा कोणतीही पूर्वसुचना व कोणतेही कारण न देता तात्काळ संपुष्टात आणली जाईल.

१२. करारपत्रातील मुद्दा क्र. ८. C VI नुसार जर एखादा कंत्राटी अधिकारी / कर्मचारी सलग ३ महिने विनापरवानगी रजेवर / गैरहजर असल्यास त्याची सेवा समाप्त होईल, अशी नवीन अट सामाविष्ट करण्यात आली आहे.

१३. अभियानांतर्गत विविध स्तरावर पदभरती करण्यात येत असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांच्या नियुक्ती आदेशात निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात करण्यात येत असुन ही नियुक्ती राष्ट्रीय आरोग्य अभियान प्रकल्प संपुष्टात येईपर्यंत किंवा करारपत्र कालावधी समाप्ती नंतर संपुष्टात येईल.

१४. शासनसेवा शर्ती खाली ही नेमणूक नसल्याने त्या अनुषंगाने मिळणारे निवृत्ती वेतन, विमा योजना, भ.नि.नि. अथवा तत्सम कोणत्याही प्रकारचे लाभ मिळण्यास पात्र राहणार नाही. अथवा नेमणूक केलेल्या पदावर कंत्राटीमध्ये नमूद केलेल्या कालावधी बाहेर कोणतेही अधिकार राहणार नाही.

१५. सदरची नेमणूक आदेश मिळाल्यापासून ७ (सात) दिवसाच्या आत कामावर रुजू व्हावे लागेल अन्यथा सदरचे आदेश आपोआप रद्द होतील.

१६. आपणास इतर शासकिय कर्मचारीप्रमाणे महाराष्ट्र सेवा नियम १९८१ अन्वये कोणतेही सेवा नियम लागू राहणार नाही.

१७. आपण कामावर रुजू होतेवेळी वैद्यकीय आरोग्य अधिकारी, पनवेल महानगरपालिका यांच्याकडे रु.१००/- च्या बॉन्डवर करारनामा लिहून दयावा लागेल. तसेच कारारनाम्यातील विहित केलेल्या अटी व शर्ती आपणांस

Scanned with OKEN Scanner

बंधनकारक राहतील. तसेच संबंधित अधिकारी/कर्मचारी यांनी स्वतःच्या नावे करारनामा (बॉन्ड) खरेदी करावा. दुसऱ्याच्या नावाने खरेदी केलेला बॉन्ड / करारनामा वापरु नये.

१८. केंद्र शासनाने संबंधित पदे सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षाकरिता नामंजुर केल्यास आपली सेवा कोणत्याही पुर्व सुचना न देता तात्काळ समाप्त करण्यात येईल.

१९. सदरील करार हा दि.२०.१०.२०२३ ते दि. २९.६.२०२४ पर्यंत असल्याने सदर कालावधीसाठी आपणांस एकुण किरकोळ रजा ०६ व वैद्यकीय रजा ०५अनुज्ञेय राहतील.

२०. संबंधित जिल्हा शल्यचिकित्सक यांचेकडील शारीरिकदृष्टया सक्षम असल्याचे प्रमाणपत्र वैद्यकीय आरोग्य अधिकारी, पनवेल महानगरपालिका यांचेकडे सादर करावे, तसेच संदर्भ क्र. ११ अन्वये वय वर्ष ६० नंतर प्रत्येक वर्षी जिल्हा शल्यचिकित्सक यांचेकडील शारीरिकदृष्टया सक्षम असल्याचे प्रमाणपत्र वैद्यकीय आरोग्य अधिकारी, पनवेल महानगरपालिका यांचेकडे सादर करावे त्यानंतरच पुर्ननियुक्ती आदेश देण्यात येईल.

२१. आपली नियुक्ती हि दि. ०२.६.२०२३ च्या जाहिरातीत नमुद औषधनिर्माता पदाच्या शैक्षणिक अर्हता, अनुभव इ. कागदपत्रांच्या मुळ प्रती तपासणीच्या अधिन राहुन करण्यात येत आहे.

२२. जात आराक्षण लागु असल्यास जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र वैद्यकीय आरोग्य अधिकारी, पनवेल महानगरपालिका यांचेकडे सादर करावे. तसेच Non-Creamy Layer प्रमाणपत्र सादर करावे.

२३. महाराष्ट्र फार्मसी कौन्सिल नोंदणी प्रमाणपत्र व नुतनीकरण प्रमाणपत्र वैदयकीय आरोग्य अधिकारी, पनवेल महानगरपालिका यांना सादर करणे बंधनकारक आहे.

२४. पोलिस Varification (चारित्र्य पडताळणी) प्रमाणपत्र वैद्यकीय आरोग्य अधिकारी, पनवेल महानगरपालिका यांना सादर करणे बंधनकारक आहे.

२५. संदर्भ क्र. १३ अन्वये राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांनी बायोमेट्रिक प्रणालीवर उपस्थितीची नोंद करणे बंधनकारक आहे.

**मा. आयुक्त महोदयांच्या मान्यतेने,**

20-10-23

(डॉ.आनंद गोसावी)
वैद्यकीय आरोग्य अधिकारी
पनवेल महानगरपालिका

प्रती,

संबंधितांस

प्रत माहितीस्तव:

१. मा. आयुक्त महोदय पनवेल महानगरपालिका यांचे स्वीय सहाय्यक

२. मा. उपायुक्त (आरोग्य), पनवेल महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner